प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
दिनांक १८.१२.२०२५

**लोकसेवक शिक्षक नितीन ठाकुर यांनी धुळे अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या अधिकाऱ्यांच्या नावाने तक्रारदार यांचेकडेस प्रती जात पडताळणी प्रमाणपत्राकरीता ३,००,०००/— रुपये प्रमाणे लाचेची मागणी केली म्हणुन गुन्हा**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | धुळे |
| **पो. ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक** | धुळे शहर पो.स्टे. गुरनं.३९६/२०२५ |
| **कलम व गुन्हा दाखल दिनांक** | भ्र.प्र. कायदा कलम ७ प्रमाणे, दि. १८.१२.२०२५ |
| **आरोपीचे नांव, वय व कार्यालय** | नितीन लिलाधर ठाकुर, वय ४६ वर्षे, उपशिक्षक, न्युसिटी हायस्कुल, धुळे, रा. प्लॉट नं. ३३, दोंदे कॉलनी, देवपुर, धुळे |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ३,००,०००/— रुपये लाचेची मागणी |
| **<u>थोडक्यात हकिगत :—</u>** तक्रारदार हे रावळगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक येथील रहिवासी असुन त्यांनी त्यांचे व त्यांच्या बहिणीचे हिंदु ठाकुर या जातीचे जात वैधता प्रमाणपत्र मिळणेकरीता आवश्यक त्या कागदपत्रांसह अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, धुळे येथे अर्ज केला होता. परंतु सुमारे तीन वर्षे होवुन देखील त्यांना जात वैधता प्रमाणपत्र न मिळाल्याने ते सदर पडताळणी प्रमाणपत्राची चौकशी करण्याकरीता सदर कार्यालयात गेले असता त्यांची तेथील संबंधित लिपीक यांचेशी भेट घेवुन तक्रारदार यांनी त्यांच्या पडताळणी प्रमाणपत्राबाबत चौकशी केली असता त्यांनी सदर कार्यालयातील जात पडताळणी प्रमाणपत्राची कामे न्युसिटी हायस्कुल येथील शिक्षक नितीन ठाकुर यांना भेटा, त्यांच्या मार्फतीनेच सदर कार्यालयातील जात पडताळणी प्रमाणपत्राची कामे करुन दिली जातात असे सांगितले होते. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी शिक्षक नितीन ठाकुर यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे समितीच्या अधिकाऱ्यांशी घनिष्ठ संबंध असुन त्यांच्या मार्फतीनेच पैसे घेवुन जात पडताळणीचे काम करुन देतात असे सांगितल्याची तक्रारदार यांनी दि.०१.०८.२०२५ रोजी ला.प्र.वि. धुळे कार्यालयात तक्रार दिली होती.<br><br>तक्रारदार यांच्या तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी केली असता शिक्षक नितीन ठाकुर यांनी पंचांसमक्ष तक्रारदार यांच्याकडे धुळे अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या अधिकाऱ्यांच्या नावाने प्रती प्रमाणपत्राकरीता २,५०,०००/— ते ३,००,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले असुन त्यांचे विरुध्द धुळे शहर पो.स्टे. ला गुन्हा दाखल करण्यात आला असुन शिक्षक नितीन ठाकुर यांना अटक करण्यात आली आहे. | |
| **सापळा पर्यवेक्षण अधिकारी** | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे<br>मो. नं. ९८३४२०२९५५, ९४०३७४७१५७ |
| **सापळा अधिकारी** | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक |
| **सापळा पथक** | पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक<br>पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, प्रविण मोरे, संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, प्रविण पाटील, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे, जगदीश बडगुजर |
| **मार्गदर्शन** | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**<u>"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"</u>**

**संपर्क पत्ता** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
**संकेतस्थळ** :— acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :— <u>dyspacbdhule@gmail.com</u>
**टोलफ्री क्रमांक** :— १०६४
**दुरध्वनी क्रमांक** :— ०२५६२—२३४०२०

**(सचिन साळुंखे)**
**पोलीस उपअधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे.**